# महाराष्ट्र शासन
# महसुल व वन विभाग
# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर
# लिपिक-टंकलेखक, तलाठी व वाहनचालक संवर्गातील भरती मोहिम सन २०१४
# जाहिरात

.........................................................................................................................

जाहिरात क्रमांक मह/आस्था/कार्या ५अ/४००/पदभरती/ २०१४ अहमदनगर, दि.०७/०५/२०१४.

महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभागाकडील, शासन निर्णय क्र.पदभरती/२०१३/प्र.क्र.४७/ई-१० दिनांक २६ फेब्रुवारी २०१४ अन्वये महसुल विभागातील तलाठी व लिपिक-टंकलेखक संवर्गातील रिक्त पदे भरणेस शासन मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मा.अपर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र.पदभरती/२०१३/प्र.क्र.१४७/ई-१० दिनांक २९/०४/२०१४ अन्वये महसुल विभागातील लिपिक-टंकलेखक व तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरणेकामी राज्यात सर्वत्र एकाच दिवशी लेखी परिक्षा घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे आस्थापनेवरील लिपिक-टंकलेखक, वाहनचालक व उपविभागीय अधिकारी यांचे आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील रिक्त पदांसाठी खालील नमूद प्रवर्गातील पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यातील अर्ज **फक्त ऑनलाईन पद्धतीने** www.ahmednagar.nic.in / http://NagarCollector.erecruitment.co.in यामार्फत मागविण्यात येत आहेत. सदरचे अर्ज दिनांक १०/०५/२०१४ ते २२/०५/२०१४ अखेर सायंकाळी ६-०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. उमेदवारांना ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्याबाबत ऑनलाईन अर्जामध्ये स्पष्ट नमुद करावे.

**१. पदनाम :-**

**अ) लिपीक- टंकलेखक ( गट –क)**

वेतन श्रेणी PB-1 रू. ५२०० - २०२०० (ग्रेड पे वेतन रू. १९००)

एकुण पदे - ४५

**(प्रवर्गनिहाय खालील नमुद तपशिलाप्रमाणे)**

| आरक्षण प्रवर्ग | रिक्त पदे | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | खेळाडु ५ % | महिला ३०% | पदविधर/पदविकाधारक अंशकालीन १० % | भुकंप ग्रस्त २% | समांतर आरक्षण विरहीत पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जा. | २ | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| अ.ज. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| विजाअ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भजब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भजक | २ | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| भजड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| विमाप्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| इमाव | २ | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| खुला | ३९ | ६ | २ | २ | १२ | ४ | १ | १२ | ३९ |
| **एकुण** | **४५** | **६** | **२** | **२** | **१५** | **४** | **१** | **१५** | **४५** |

**ब) तलाठी ( गट –क) : -**

वेतन श्रेणी PB-1 रू. ५२०० - २०२०० (ग्रेड पे वेतन रू. २४००)

एकुण पदे - ७१

| आरक्षण प्रवर्ग | रिक्त पदे | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | खेळाडु ५ % | महिला ३०% | पदविधर/पदवि काधारक अंशकालीन १० % | भुकंप ग्रस्त २% | समांतर आरक्षण विरहीत पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जा. | ८ | १ | ० | ० | २ | १ | ० | ४ | ८ |
| अ.ज. | ७ | १ | ० | ० | २ | १ | ० | ३ | ७ |
| विजाअ | ४ | १ | ० | ० | १ | ० | ० | २ | ४ |
| भजब | २ | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| भजक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भजड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| विमाप्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| इमाव | २२ | ३ | १ | १ | ७ | २ | ० | ८ | २२ |
| खुला | २८ | ४ | १ | १ | ८ | ३ | १ | १० | २८ |
| **एकुण** | ७१ | १० | २ | २ | २१ | ७ | १ | २८ | ७१ |

**क) वाहनचालक (गट क)**

वेतन श्रेणी PB-1 रू. ५२०० - २०२०० (ग्रेड पे वेतन रू. १९००)

एकुण पदे - ४

| आरक्षण प्रवर्ग | रिक्त पदे | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | खेळाडु ५ % | महिला ३०% | पदविधर/पदवि काधारक अंशकालीन १० % | भुकंप ग्रस्त २% | समांतर आरक्षण विरहीत पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जा. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भजक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |
| **एकुण** | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ४ |

**टीप :-**

**१)** अतिरिक्त संवर्ग, आंतरविभागीय समायोजन, विभागीय बदली व इतर विभागातील पदांचा आढावा इत्यादी वा अन्य कारणामुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी / जास्त होणे) व आरक्षण /समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

**२)** समांतर आरक्षणासंदर्भात दर्शविणेत आलेली पदसंख्या स्वतंत्र नाही. सदर आरक्षण त्या त्या प्रवर्गातील एकूण पदांपैकी आहे.

**३)** वरील लिपिक-टंकलेखक व तलाठी संवर्गामधील खुल्या प्रवर्गामध्ये दर्शविण्यात आलेल्या पदांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. सदरची रिक्त पदे ही भविष्यात पदोन्नती, सेवानिवृत्ती व इतर कारणांमुळे रिक्त होणारी पदे विचारात घेऊन दर्शविलेली आहे. एखाद्या जातप्रवर्ग व समांतर आरक्षणामध्ये पदे दर्शविलेली नसली व भविष्यात पुढे सदरचे पद रिक्त झाल्यास प्राप्त झालेल्या अर्जांमधुन गुणवत्तेनुसार सदरचे पद भरले जाईल. त्यामुळे अर्जदार यांनी अर्ज करताना ऑनलाईन अर्जामध्ये त्यांचा जातप्रवर्ग व समांतर आरक्षण स्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे. ऑनलाईन एकदा सादर केलेनंतर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

**४)** पदांमध्ये बदल झाल्यास अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. पदांची संख्या, समांतर

आरक्षणात बदल करणे याबाबतचे सर्व अधिकारी मा.जिल्हाधिकारी अहमदनगर हे स्वतःकडे राखुन ठेवत आहे. याबाबत कोणलाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

**५)** तलाठी पदावर अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम ६ महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येईल. सदरचा कालावधीमध्ये ते परिविक्षाधीन कर्मचारी म्हणुन गणले जातील व सदरचे प्रशिक्षण पुर्ण झालेनंतरच त्यांना तलाठी पदावर नियमित पदस्थापना संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत देण्यात येईल.

**२. शैक्षणिक पात्रता :-**

**पदाचे नाव — अ) लिपिक - टंकलेखक व कनिष्ट श्रेणी लिपिक (गट क)**

**i)** एस.एस.सी. (शालांत प्रमाणपत्र परीक्षा ) उत्तीर्ण

**ii)** टंकलेखन :- टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र मराठी ३० शब्द प्रती मिनीट किंवा इंग्रजी ४० शब्द प्रती मिनीट परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ दि.०६ ऑक्टोबर २०१० नुसार फक्त प्रकल्पग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी व पदवीधर/पदविकाधारक अशंकालीन कर्मचारी या घटकातील उमेदवारांना टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यात येईल.
- माजी सैनिक प्रवर्गामधील उमेदवारांकडे टंकलेखनाचे प्रमाणपत्र नसल्यास अशा उमेदवारांनाटंकलेखनाचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून ११ महिन्यांत प्राप्त करणे बंधनकारक असेल.

**iii)** सदर पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हताळणी वापराबाबतचे खाली नमुद प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासुन २ वर्षाचे आत प्राप्त करणे आवश्यक राहिल

D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C C किंवा O स्तर किवा A स्तर किवा B स्तर, C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झालेचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य व तंत्रशिक्षण मंडळ यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झालेचे प्रमाणपत्र.

**iv)** महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि) विभागाकडील शासन निर्णय क्र.मातंस २०१२/प्रक्र.२७७/ ३९ दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ मध्ये नमुद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

**पदाचे नाव - ब) तलाठी**

**i)** संविधानिक विद्यापीठाची पदवी किंवा शासनाने त्यांच्याशी समतुल्य केलेली अन्य अर्हता धारण करणे आवश्यक.

**पदाचे नाव - क) वाहनचालक**

**i)** वाहनचालक पदासाठी ४ थी उत्तीर्ण आवश्यक.

**ii)** वाहनचालक पदासाठी इतर आवश्यक अर्हता -

१) मोटार वाहन अधिनियमातील तरतुदीनुसार जड वाहन किंवा मोटारकार किंवा जीप चालविण्याचा व अस्तित्वात असलेला परवाना असणे आवश्यक.

२) स्वयंचलित दुचाकी व्यतिरिक्त अन्य स्वयंचलित वाहने चालविण्यचा तीन वर्षाचा अनुभव आवश्यक.

३) मोटार कार किंवा जीप यांच्या दुरस्तीचे ज्ञान असणे आवश्यक.

४) सुदृढ प्रकृतीमान आणि संबंधित क्षेत्रातील भौगोलिक परिस्थीतीचे ज्ञान आवश्यक.

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ व शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक २८ मार्च २००५ अन्वये शासनाने गट अ,ब,क व ड मधील पदाचा सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणुन विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.

**३. वयोमर्यादा ( सर्व पदांसाठी ):-**

१. उमेदवाराचे वय दिनांक **०९/०५/२०१४** रोजी किमान १८ वर्ष आवश्यक असुन कमाल वयोमर्यादा ३३ वर्ष खुल्या प्रवर्गासाठी व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्ष राहील.

२. महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या आणि महाराष्ट्राचा रहिवासी असलेल्या अ.जा., अ.ज. विजाभज, विमाप्र आणि इमाव उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ३८ वर्ष एवढी असेल. परंतू उन्नत व प्रगत गटांमध्ये (Non-Creamylayer) मोडणा-या विजाभज, विमाप्र आणि इमाव उमेदवारांना ही सवलत लागू नाही.

३. माजी सैनिक यांच्यासाठी कमाल वयोमर्यादा ही त्यांनी सशस्त्र सेनेमध्ये केलेली सेवा अधिक तीन वर्षे इतकी राहिल आणि फक्त सेवेमध्ये कार्यरत असतांना अपंगत्व आल्यास (अपंग माजी सैनिकांसाठी) कमाल ४५ वर्षे असेल.

४. खेळांडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेली वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिल केली जाईल.

५. सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य योजनेंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये सलग तीन वर्षांपर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवधीर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवाराला उच्चतम वयोमर्यादा ४६ वर्ष राहिल.

६. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ दिनांक ०६ ऑक्टोबर २०१० अन्वये स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य/१९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी यांचेसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष एवढी राहील.

७. प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, अपंग उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ही ४५ वर्ष एवढी असेल.

**४. सर्वसाधारण अटी व शर्ती -**

**अ) खेळाडु उमेदवारांकरिता -**

१. शासन निर्णय दिनांक ३०/०४/२००५ नुसार पात्र उमेदवार नियुक्तीसाठी पात्र राहतील.

२. खुल्या प्रवर्गातील उन्नन आणि प्रगत कुटूंबातील व्यक्तींना (क्रिमीलेअर) खेळाडुंसाठी असलेले ५ % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील, विमुक्त जाती (अ), विमाप्र, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) आणि इतर मागासवर्ग या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत गटातील खेळाडु उमेदवारांना ५% आरक्षण अनुज्ञये राहणार नाही.

३. खेळाडु उमेदवारांना नियुक्ती देणेपुर्वी त्यांचे खेळाचे प्रमाणपत्र मा.संचालक युवा व क्रिडा संचालय पुणे यांचेकडुन पडताळणी केले जाईल.

**ब) महिला उमेदवारांकरिता -**

१. इतर मागासवर्ग, विजाअ, विमाप्र, भजब, भजक आणि भजड या प्रवर्गातील व त्या त्या संवर्गातील महिला सदस्यासाठी प्रगत व्यक्ती अथवा उन्नत व्यक्ती गटातील उमेदवारांना तसेच महिलांना ३०% आरक्षण अनुज्ञये राहणार नाही. महिलांकरीता ३० टक्के आरक्षणाच्या सवलतीसाठी उन्नत व्यक्ती / गट

(क्रिमीलेअर) या मध्ये मोडत नसल्या बाबत सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. असे प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अर्ज महिला प्रवर्गांतर्गत ग्राहय धरला जाणार नाही.

२. शासन निर्णय दिनांक २५ मे २००१ नुसार पुरेशा प्रमाणात महिला उपलब्ध न झाल्यास इतरत्र अदलाबदल न करता त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधुन महिलांसाठी राखीव असलेली पदे भरण्यात येतील.

३. खुल्या प्रवर्गामधील महिला उमेदवारांचे उन्नत अणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र मा.आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडुन पडताळणी केले जाईल. तद्नंतर नियुक्तीबाबत कार्यवाही केली जाईल.

**क) पदविधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी -**

१. अर्जदार हा पदविधर / पदवीधारक अंशकालीन कर्मचारी / उमेदवार असल्यास त्यांना शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय दिनांक २६.८.२००५ व दिनांक २७.१०.२००९ मधील तरतुदीनुसार उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

२. पदविधर / पदवीधारक अंशकालीन उमेदवारांचे रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडुन ३ वर्षाच्या अनुभवाची/अनुभवाबाबत मिळालेले मुळ प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या प्रतीसह अंतिम निवड झालेनंतर नियुक्तीचे वेळी जमा करुन घेतले जाईल.

**ड) प्रकल्पग्रस्त उमेदवारांसाठी**

१. प्रकल्पग्रस्त उमेदवारांना सक्षम अधिका-यांनी दिलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**इ) माजी सैनिक उमेदवारांसाठी**

१. माजी सैनिक उमेदवारांकडेस माजी सैनिक असलेबाबत डिस्चार्च कार्ड असणे आवश्यक आहे. सदर उमेदवारांना नियुक्ती देणेपुर्वी त्यांचे डिस्चार्च कार्ड संबंधित सैनिक कल्याण अधिकारी यांचेमार्फत पडताळणी केले जाईल.

२. माजी सैनिकांसाठी वर्ग ३ मधील आरक्षित असलेल्या १५ टक्के पदांवर भरती करताना युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे अपंग झालेल्या माजी सैनिकांना १५ टक्के राखीव पदापैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्त करणेत येईल.

३. युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त एका व्यक्तीला त्यानंतरच्या पसंतीक्रमाने वर्ग ३ मधील १५ टक्के आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदावंर नियुक्त करणेत येईल.

**५. इतर अटी व शर्ती :-**

१. उमेदवार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.

२. उमेदवाराने अर्ज करताना ऑन लाईनअर्जामध्ये लिपिक-टंकलेखक / तलाठी / वाहनचालक नमुद करणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामधील लिपिक-टंकलेखक व वाहनचालक पदासाठी एकाचवेळी एकाचदिवशी लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे.

३. मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक

४. विहीत वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवागनीची प्रत कागदपत्रे तपासणीच्यावेळी सादर करणे

आवश्यक राहील.

५. शासन निर्णय क्रमांक अनियो-१०५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ मधील तरतुदीनुसार दिनांक १.११.२००५ नंतर नियुक्तीसाठी पात्र ठरणा-या कर्मचा-यांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागू राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना ( म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण ) नियम १९८४ ) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

८. प्राप्त अर्जापैकी अर्जदाराने किमान शैक्षणिक पात्रता प्राप्त उमेदवारांना लेखी परिक्षेकामी बोलाविण्यात येईल.

१०. विहीत अर्हता व वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही. जाहीरातीच्या दिनांकास विहीत अर्हता व वयोमर्यादा नसलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नयेत.

११. न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक वा तत्सम इ. कारवाईसंबंधीची माहिती अर्जातील संबंधित परिच्छेदात नमुद करावी. नमुद केलेल्या माहितीमध्ये अर्ज सादर केल्यापासून निवडप्रक्रीया संपेपर्यंत काळात घडणारे बदल उमेदवाराने कळविणे आवश्यक राहील. ही माहिती न दिल्यास तसेच त्यात नंतर घडून आलेले बदल उमेदवाराने न कळविल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यानंतर रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारास राहतील.

१२. उमेदवारांना लेखी  परिक्षेला उपस्थित राहण्यासाठी येण्या - जाण्याचा प्रवास खर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही.

१३. उमेदवाराची निवड झाल्यास तो जिल्हाधिकारी यांचे आस्थापनेवरील जिल्हा कार्यालय अथवा अधिनस्त उपविभागीय / तहसिल कार्यालय, यांचे कार्यालयात नियुक्तीस पात्र राहतील.

१४. **प्रक्रिया शुल्क** :- उमेदवारांनी खालीलप्रमाणे प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे.(सर्व पदांसाठी)

| प्रवर्ग | खुला प्रवर्गातील उमेदवारांसाठी | मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी |
|---|---|---|
| **परिक्षा शुल्क** | **रु. ३५०/-**<br>**रु.तीनशे पन्नास मात्र** | **रु. २००/-**<br>**रु. दोनशे मात्र** |

**माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागु नाही**.

उक्त परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईल अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाद्वारेच भरणे आवश्यक आहे. सदरची रक्कम ही क्रेडीट कार्ड किंवा डेबीट कार्डद्वारे देखिल भरता येईल. सदरची रक्कम ही नापरतावा असेल.

१५. **उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही.** परंतु ऑनलाईन अर्जामध्ये संपुर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरताना खोटी किंवा विसंगत / दिशाभुल माहिती भरलेचे निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवारावर फसवणुकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. लेखी परीक्षेनंतर गुणवत्तेनुसार विचारक्षेत्रात असलेल्या उमेदवारांचे मुळ कागदपत्रांची तपासणी केली जाईल. तद्नंतर अंतिम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिद्ध केली जाईल.

१६. एकापेक्षा जास्त पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास, प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज व परिक्षा शुल्क भरावे लागेल.

१७. भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रीया पुर्ण होईपावेतो सुधारित शासन निर्णय / परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.

१८. उमेदवाराची लेखी परीक्षा ही कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामूळे लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही.

नियुक्तीपूर्वी, मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, नॉनक्रिमीलेअर दाखला, तसेच इतर आवश्यक ती सर्व कागदपत्रे / साक्षांकित प्रमाणपत्रे (साक्षांकन हे केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी / पोस्टमास्तर / प्राचार्य व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे) इ. ची छाननी या कार्यालयाचे स्तरावर केली जाईल. त्यावेळी मूळ प्रमाणपत्रे दाखविणेही बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती वरील प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही / नियुक्ती रद्द होईल.

१९. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र त्यांचेकडेस असणे आवश्यक आहे. अर्जदार यांचेकडेस अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन महसुल व वन विभागाकडील निर्णय दिनांक २७ जुन २०११ नुसार त्यांचेकडेस महाराष्ट्र राज्यात जन्म झालेबाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे.

२०. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

२१. परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २७ जून २००८ मधील नमूद निकषावर क्रम लावला जाईल.

२२. अहमदनगर जिल्हयामध्ये पदस्थापना दिल्यानंतर शासन तरतुदीनुसार दोन पदावधी पुर्ण होईपावेतो (६ वर्षांपर्यंत) आंतरजिल्हा / आंतरविभाग बदली अनुज्ञेय राहणार नाही याची सर्व परिक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी

२३ समांतर आरक्षणामधुन अर्ज करणा-या उमेदवाराने एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

**६. <u>लेखी परिक्षा</u> –**

| अ. क्र. | पदाचे नाव | लेखी परीक्षेचा दिनांक | परीक्षेचे स्वरुप | परीक्षेचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| १. | लिपिक - टंकलेखक | **०८/०६/२०१४** | २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परिक्षा लेखी परिक्षेत मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयाकरिता प्रत्येकी ५० गुण राहतील. | माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी) दर्जाच्या समान राहील. |
| २. | वाहन चालक | **०८/०६/२०१४** | लेखी परिक्षा - ५० गुण.<br>व्यावसायिक चाचणी - ४० गुण<br>मुलाखत - १० गुण<br>एकुण गुण - १००<br>(टिप- लेखी परीक्षेमध्ये गुणवत्तेनुसार व रिक्त जागेंच्या प्रमाणानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच फक्त व्यावसायिक चाचणी व मुलाखतीसाठी बोलविले जाईल) | जिल्हयाचा भुगोल, सामाजिक इतिहास, हवामान, सामान्य ज्ञान या विषयांशी निगडीत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | तलाठी | **२२/०६/२०१४** | २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा लेखी परिक्षेत मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयाकरिता प्रत्येकी ५० गुण राहतील. | परिक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (१२ वी) दर्जाच्या समान राहील. |
| **टिप** | लिपिक-टंकलेखक व तलाठी पदासाठी मुलाखत नाही. | | | |
| | उमेदवारांचे गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने लेखी परिक्षेच्या एकुण गुणांच्या किमान ४५% टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. | | | |

## ७. अर्ज करण्याची पध्दत :-

१. जाहिरात काळजीपुर्वक वाचावी.

२. ऑनलाईन अर्ज WWW.ahmednagar.nic.in / http://NagarCollector.erecruitment.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

३. ज्या पदासाठी उमेदवार ऑनलाईन अर्ज भरणार आहे त्या पदाची पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपुर्वक वाचावी. लहान कुटूंब असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र नमुना सदर संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे व स्वतःचा अलिकडील काळातील पासपोर्ट फोटो स्वतः जवळ असल्याची खात्री करावी. अर्ज भरतेवेळी फोटो, सही स्कॅन करुन अपलोड करावी.

५. उमेदवार MKCL च्या अधिकृत अध्यायन केंद्रामध्ये (ALC) जावुन अर्ज करु शकतील.

६. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर Apply Online या लिंक वर क्लिक करुन अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

७. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे ते पद निवडा, एक-एक करत आपणास ऑनलाईन विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरासाठी योग्य पर्याय निवडा. संगणक प्रणाली तुम्ही दिलेल्या उत्तरांच्या आधारे तुमची प्राथमिक पात्रता तपासेल.

८. जर प्राथमिक पात्रता चाचणीत आपण पात्र असाल, ज्या पदासाठी अर्ज भरावयाचा आहे ते पद निवडा आणि आवश्यक माहिती भरा.

९. आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणालीत तुमचा लॉगीन (Login) आयडी (ID) आणि पासवर्ड (Password) निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रीनवर दाखवेल आणि तुम्ही पुरवलिलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर एसएमएस (SMS) करेल. (कृपया आपला भ्रमणध्वनी क्रमांक अचुक टाकावा) तुमचा लॉग इन आयडी म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असल्याची नोंद घ्यावी.

१०. उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वित असलेला भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमुद करावा जेणेकरुन आपणास संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

११. **अर्जाचे वेळापत्रक : -**

| **अ.क्र** | **तपशील** | **कालावधी** | |
|---|---|---|---|
| | | **पासुन** | **पर्यंत** |
| १. | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | १०/०५/२०१४ | २२/०५/२०१४ |
| २. | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | ११/०५/२०१४ | २३/०५/२०१४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | ज्यांचे अर्ज दि.२२.५.२०१४ रोजी दाखल झाले आहेत व ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दि. २३.५.२०१४ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उर्वरित ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | ११/०५/२०१४ | २६/०५/२०१४ |

१२. माहिती भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वतः काढावी किंवा MKCL च्या अधिकृत अध्यायन केंद्रातुन (ALC) सशुल्क काढुन दिली जाईल. ती आपल्या माहितीसाठी जतन करुन ठेवावी. अर्जदाराने नियमितपणे वेबसाईटला भेट द्यावी. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रत प्रिंट काढुन जिल्हाधिकारी कार्यालय अ.नगर किंवा MKCL पाठविण्याची आवश्यकता नाही.

१३. पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, प्रवेशपत्र, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक, इ. बाबत माहिती MKCL च्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध राहील.

१४. ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क मुदतीत अदा केले आहे व संपुर्ण माहिती भरून प्रिंट काढलेली आहे त्यांना **लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र त्यांच्या लॉगीन आयडीद्वारे MKCL च्या वरील नमूद संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येईल किंवा MKCL च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रावरुन प्राप्त करुन घेता येईल.** यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा जिल्हाधिकारी कार्यालयामधुन लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१५. लेखी परिक्षेचे प्रवेशपत्रावर नमुद जातप्रवर्ग, समांतर आरक्षण, नाव, पत्ता यामध्ये काही दुरुस्ती असल्यास त्याचवेळेस सदरची बाब संबंधित MKCL च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रावर निदर्शनास आणुन देण्यात येऊन त्यामध्ये आवश्यक तो बदल करुन घ्यावा. नंतर त्यात बदल करता येणार नाही.

१६. परीक्षा केंद्रावर ओळखपत्रासह परीक्षा सुरु होण्यापुर्वी एक तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा येणा-या व प्रवेशपत्र न आणणा-या उमेदवारांना परीक्षेकरिता प्रवेश दिला जाणार नाही, तसेच उमेदवारांनी स्वतःचे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणुक ओळखपत्र इ. सोबत आणणे बंधनकारक राहील.

१७. अर्जामध्ये नमुद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळुन आल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहिल. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढुन टाकण्यास पात्र राहील व भा.दं.वि. संहिताचे कलम १९९ व २००(२) प्रमाणे कारवाईस पात्र राहिल.

१८. ऑनलाईन अर्ज भरणेविषयाी अधिक माहिती संदर्भात ९३२६५५२५२५ या Help Line क्रमांकावर संपर्क साधावा.

**८. लेखी परीक्षेनंतर अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीचेवेळी पात्रतेबाबत खालील कागदपत्रे सादर करावी लागेल (खालील सर्व कागदपत्रे जाहिरातीच्या दिनांकास उमेदवाराकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे) :-**

१. समांतर आरक्षण प्रवर्गामधुन (पदविधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, खेळाडु, भुकंपग्रस्त, महिला इ.) अर्ज करणा-या उमेदवारांनी त्या समांतर आरक्षण प्रवर्गामध्ये मोडत असलेबाबत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

२. समांतर आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांचे बाबतीत यापुर्वी शासकीय / निमशासकीय सेवेकरिता समांतर आरक्षणाचा लाभ घेतला नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र.

३. खुल्या प्रवर्गामधील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यांमध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे सन २०१४-१५ या कालावधीचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र.

४. सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही.२०००/प्रक्र.१७/२०१०/१२ दिनांक २८/३/२००५ व

शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही.२०००/प्रक्र.१७/२००० दि.१/७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये दि.२८/३/२००५ नुसार रोजी हयात असलेल्या व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या याबाबत लहान कुटूंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र. अविवाहीत उमेदवारांनी सादर करणे अनिवार्य आहे.

५. शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला, जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जातवैधता प्रमाणपत्र, अ.ज. व अ.जा. प्रवर्गामधील उमेदवार वगळुन इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र. (२०१४-१५)

६. शासनाचे महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्रक्र.४१५/का.२ दि. २५/५/२००१ अन्वये खुला, वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड.,वि.मा.प्र., इ.मा.व. या प्रवर्गामधील महिला उमेदवारांना राखीव पदांसाठी निवड झाल्यास त्यांना नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र आवश्यक.

७. वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र., इ.मा.व. या प्रवर्गामधील उमेदवारांना सक्षम अधिका-याचे जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र.

८. माजी सैनिक उमेदवारांच्याबाबतीत डिस्चार्ज कार्ड.

९. उच्चतम शैक्षणिक अर्हतेबाबतच सर्व कागदपत्रे

१०. वाहनचालक पदासाठी जड वाहन किंवा मोटारकार किंवा जीप चालविण्याचा परवाना, वाहनचालविणेचा ३ वर्षाचा अनुभव असलेबाबत प्रमाणपत्र.

**<u>९. विशेष सूचना –</u>**

१) विहीत पद्धतीने अर्ज नसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा अधिकार मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जिल्हा निवड समिती, अहमदनगर यांनी स्वतःकडे राखून ठेवला असून याबाबत उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही.

२) पदभरती प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही..

३) निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

४) अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीचा वा खोटी आढळून आल्यास, सदर उमेदवार दंडात्मक कारवाईसाठी तसेच त्याआधारे नियुक्ती झाल्यास सेवेतून काढण्यास पात्र राहील.

५) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

६) नैसर्गिक आपत्ती अथवा इतर कारणास्तव विहीत दिनांकास लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तसेच जाहिरातीत नमुद दिनांकात काही बदल झालेस परिस्थितीनुरुप सोयीनुसार पुढील दिनांक निश्चीत करुन वर्तमानपत्रामधुन व जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल.

७) प्रस्तुत परिक्षेच्या अनुषंगाने वेळोवेळी देण्यात येणा-या सूचना, निकाल व अनुषंगीक माहिती जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे संकेतस्थळ www.ahmednagar.nic.in वर प्रसिद्ध करण्यात येईल. व्यक्तीगत सूचना, माहिती दिली जाणार नाही.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **सदस्य सचिव** | **अध्यक्ष** |
| **जिल्हा निवड समिती तथा** | **जिल्हा निवड समिती तथा** |
| **निवासी उपजिल्हाधिकारी अहमदनगर** | **जिल्हाधिकारी अहमदनगर** |